महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
**सीआयएन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४५**
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in, ई-मेल cecommho@gmail.com

---

**क्र.मु.अ.(वा)/वि.म. सवलत/** No 1 7 9 1 3 **दिनांक :** 06 JUL 2022

## वाणिज्य परिपत्रक क्र. ३३७

**विषय:** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना सद्यस्थितीत शासनामार्फत देण्यात येत असलेल्या वीजदर सवलतीचे सुसूत्रीकरण करण्याबाबतचा दि.२३/०६/२०२२ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दि.०४/०६/२०१६
२) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दि.२९/०६/२०१६
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२४/०३/२०१७
४) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२३/११/२०१७
५) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.०६/०२/२०१९
६) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.०८/०३/२०१९
७) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१८४/ऊर्जा-५ दि.०८/०३/२०१९
८) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.८२/ऊर्जा-५ दि.२४/०६/२०२१
९) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.११०/ऊर्जा-५ दि.२३/०६/२०२२

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रात उद्योग यावेत व या क्षेत्राची औद्योगिक, सामाजिक व आर्थिक भरभराट होण्याच्या दृष्टीने दि.०१/०४/२०१६ पासून शासनामार्फत या क्षेत्रातील पात्र औद्योगिक ग्राहकांना संदर्भिय २ ते ७ शासन निर्णयातील तरतूदीनुसार वीज दरात सवलत लागू होती.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणाऱ्या सवलतींचा अभ्यास करुन त्याचे सुसूत्रीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने संदर्भिय शासन निर्णय क्र.८ अन्वये अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने विद्यमान सवलतीचे सुसूत्रीकरण करण्याबाबत शासनाने संदर्भ क्र.९ नुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

**शासन निर्णय:**

१. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील पात्र औद्योगिक ग्राहकांना देण्यात येत असलेल्या संदर्भिय शासन निर्णय (२) ते (७) मधील वीजदर सवलतीं संदर्भात लागू असलेल्या बाबी दि.०१.०४.२०२२ पासून अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच संस्थात्मक बाबींबाबतच्या तरतूदी तशाच ठेवण्यात येत आहेत.

२. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील, सुसूत्रीकरणाच्या योजनेनुसार पात्र औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणारी वीजदर सवलत, औद्योगिक ग्राहकांच्या त्या त्या आर्थिक वर्षाच्या वीज वापरावर त्या त्या आर्थिक वर्षात रु.१२०० कोटीच्या मर्यादेत, अर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अधीन राहून देण्यात येईल.

ज्या आर्थिक वर्षाकरिता महावितरणला वितरित झालेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीचा विनियोग त्या वर्षाच्या देय वीज वापराच्या सवलतीपोटी रू.१२०० कोटी किंवा उपलब्ध निधीच्या मर्यादेत त्या आर्थिक वर्षात

काही तांत्रिक कारणास्तव देणे शक्य झाले नाही अशी सवलत अपवादात्मक परिस्थितीमध्ये पुढील आर्थिक वर्षात शासनपूर्व मान्यतेने पात्र औद्योगिक ग्राहकांना अदा करता येऊ शकेल.

सदर सवलतीची प्रति औद्योगिक ग्राहक कमाल वार्षिक मर्यादा रु.२० कोटी इतकी राहील.

३. सदर शासन निर्णय दि.०१.०४.२०२२ पासून औद्योगिक ग्राहकांच्या आर्थिक वर्षातील वीज वापराच्या अनुषंगाने लागू करण्यात यावा. तसेच सदर योजना सन २०२३-२४ पर्यंत राबविण्यात यावी.

४. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील पात्र औद्योगिक ग्राहकांना पुढीलप्रमाणे वीज दरात सवलत लागू करण्यात येत आहे.

**(१) स्थिर सवलत (Fixed incentives):**
खालील ग्राहक वर्गवारीतील पात्र कार्यरत औद्योगिक ग्राहकांच्या मासिक वीज वापरावर खालील तक्त्यानुसार स्थिर सवलत अनुज्ञेय असेल.

| विभाग | लघुदाब (LT) (पैसे/युनिट) | उच्चदाब (HT) (पैसे/युनिट) | अतिउच्चदाब (EHV) (पैसे/युनिट) |
|---|---|---|---|
| विदर्भ | ८० | ४५ | ४० |
| मराठवाडा | ६० | ३५ | ३० |
| उत्तर महाराष्ट्र | ४० | २५ | २० |
| डी | २० | १५ | १० |
| डी+ | ६० | ३५ | ३० |

**(२) कार्यक्षमतेवर आधारित सवलत (Efficiency Based Incentive):**
लघुदाब, उच्चदाब व अतिउच्चदाब वर्गवारीतील औद्योगिक ग्राहकांच्या मासिक वीज वापरावर लागू होणाऱ्या पॉवर फॅक्टर/लोड फॅक्टर व Time of Day (ToD) यावर कार्यक्षमतेवर आधारित सवलत पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असेल.

**(अ) लघुदाब औद्योगिक ग्राहकांना पॉवर फॅक्टरवर आधारित सवलत:**

| विभाग/पॉवर फॅक्टर | ०.९५५ ते ०.९७४ (पैसे/युनिट) | ०.९७५ ते ०.९९४ (पैसे/युनिट) | ०.९९५ ते १.० (पैसे/युनिट) |
|---|---|---|---|
| विदर्भ | ६५ | ७० | ७५ |
| मराठवाडा | ५५ | ६० | ६५ |
| उत्तर महाराष्ट्र | २५ | ३० | ३५ |
| डी व डी + | १५ | २० | २५ |

**(ब) उच्चदाब औद्योगिक ग्राहकांकरिता लोड फॅक्टरवर आधारित सवलत:**

| विभाग/ लोड फॅक्टर | ७६% ते ८२%* (पैसे/युनिट) | ८३% ते ८८%* (युनिटोसैप) | *८९% ते १००% (युनिटोसैप) |
|---|---|---|---|
| विदर्भ | २५ | ४० | ५० |
| मराठवाडा | २० | ३५ | ४५ |
| उत्तर महाराष्ट्र | ५ | १० | १५ |
| डी व डी + | ५ | १० | १५ |
| **टिप:** * दशांश अंक जवळच्या पूर्णांकाशी Round off करुन | | | |

**(क) अतिउच्चदाब औद्योगिक ग्राहकांकरिता लोड फॅक्टरवर आधारित सवलत:**

| विभाग/लोड फॅक्टर | ७६% ते ८२%* (पैसे/युनिट) | ८३% ते ८८%* (युनिट/सैप) | *८९% ते १००% (युनिट/सैप) |
|---|---|---|---|
| विदर्भ | २० | २५ | ३५ |
| मराठवाडा | १५ | २० | ३० |
| उत्तर महाराष्ट्र | ५ | १० | १५ |
| डी व डी + | ५ | १० | १५ |
| **टिप:** * दशांश अंक जवळच्या पूर्णांकाशी Round off करुन | | | |

**(ड) ToD वर आधारित सवलत:**

विजेची उपलब्धता व मागणी यांच्यात समतोल राखण्याच्या दृष्टीने ToD (Time of Day) वर आधारित सवलत अनुज्ञेय असेल, जेणेकरुन सकाळच्या व सायंकाळच्या महत्तम मागणी कालावधीमधील भार, रात्रीच्या व दुपारच्या किमान मागणी कालावधीमध्ये स्थलांतरित होईल. सदर सवलत खालीलप्रमाणे अनुज्ञेय असेल.

(पैसे/युनिट)

| विभाग /ToD स्लॉट | लघुदाब (LT) | | उच्चदाब (HT) | | अतिउच्चदाब (EHV) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्लॉट-१ | स्लॉट-२ | स्लॉट-१ | स्लॉट-२ | स्लॉट-१ | स्लॉट-२ |
| विदर्भ | ५० | २० | १० | ५ | ५ | ५ |
| मराठवाडा | ५० | २० | १० | ५ | ५ | ५ |
| उत्तर महाराष्ट्र | ५० | २० | १० | ५ | ५ | ५ |
| डी व डी+ | ५० | २० | १० | ५ | ५ | ५ |

**स्लॉट-१-** २२.०० hrs ते ०६.०० hrs

**स्लॉट-२-** ०६.०० hrs ते ०९.०० hrs ते १२.०० hrs ते १८.०० hrs

ToD मीटर असलेल्या लघुदाब औद्योगिक ग्राहकांना मीटरमध्ये दर्शविलेल्या स्लॉट-२ मधील एकूण मासिक वीज वापराच्या २/३ इतक्या वीज वापरावर उपरोक्तप्रमाणे स्लॉट-२ ची सवलत देण्यात यावी.

ToD मीटर नसलेल्या लघुदाब औद्योगिक ग्राहकांना मीटरमध्ये दर्शविलेल्या एकूण मासिक वीज वापराच्या २/३ इतक्या वीज वापरावर उपरोक्तप्रमाणे स्लॉट-२ ची सवलत देण्यात यावी.

**(३) नवीन/विस्तारीत उद्योगांना सवलत:**

१. नवीन उद्योग म्हणजे दि.०१.०४.२०१६ पासून नव्याने प्रस्थापित झालेले अथवा लिलावाव्दारे /NCLT न्यायालयीन आदेशाव्दारे नवीन मालक असल्यास असे उद्योग.

अशा नवीन उद्योगांकरिता जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग संचालनालयाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२. विस्तारीत उद्योग म्हणजे उद्योग विभागाने प्रचलित सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुज्ञेय पात्रता तपासून विस्ताराबाबतचे प्रमाणपत्र दिलेले औद्योगिक ग्राहक.

अशा औद्योगिक ग्राहकांच्या वाढीव वीज वापराची परिगणना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर आदेशातील तरतूदीनुसार लागू करण्यात यावी व त्याचा व्यावसायिक उत्पादन (CoP) सुरु झाल्याचा दिनांक ०१.०४.२०१६ किंवा त्यानंतरचा असावा. विस्तारीत उद्योगांकरिता वाढीव वीज वापर हा व्यावसायिक उत्पादन सुरु झालेल्या दिनांकापूर्वीच्या मागील तीन वर्षांचा सरासरी वीज वापर विचारात घेऊन त्यावर सवलत अनुज्ञेय असेल.

३. नवीन/विस्तारीत उद्योगाची अतिरिक्त सवलत नवीन उद्योग सुरु झाल्याच्या/विस्तारीत झाल्याच्या दिनांकापासून (CoP) पुढील तीन वर्षांपर्यंत किंवा योजनेचा कालावधी संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत देण्यात यावी. सदर सवलत ही अतिरिक्त स्वरुपाची असेल म्हणजेच कार्यक्षमतेवर आधारित सवलत व ToD सवलत या व्यतिरिक्त असेल. तीन वर्षे संपल्यानंतर सदर उद्योगांना नवीन/ विस्तारीत उद्योगांना देण्यात येणारी सवलत वगळता इतर सवलती योजना कालावधी पुरत्या अनुज्ञेय राहतील. ज्या ग्राहकांनी नवीन/विस्तारीत उद्योगाच्या सवलतीचा लाभ यापूर्वी संदर्भिय शासन निर्णय क्र.२ ते ७ मधील तरतूदीं अंतर्गत घेतलेला आहे. अशा उद्योगांना नवीन/विस्तारीत सवलतीचा लाभ पुन्हा घेता येणार नाही.

४. विस्तारीत उद्योगांना स्थिर सवलत ही एकूण वीज वापरातून वाढीव वीज वापर वजा करुन त्यावर देण्यात यावी.

५. जर एखादा औद्योगिक ग्राहक मुक्त प्रवेशामधून पूर्णपणे महावितरण कंपनीकडे आल्यास व त्याने वीज करार मागणी (महावितरण + मुक्त प्रवेश) (MSEDCL + OA) वाढविल्यास अशा ग्राहकाच्या चालू वर्षाच्या मासिक वाढीव वीज वापराची तुलना उपरोक्त मुद्दा क्र.२ प्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रचलित वीजदर आदेशामधील तरतूदीप्रमाणे (महावितरण + मुक्त प्रवेश) (MSEDCL+ OA) वीज वापराशी करावी.

६. दि.०१.०४.२०२२ पूर्वी विस्तारीत उद्योगाची सवलत घेणारे ग्राहक परंतु ज्या ग्राहकांनी पूर्वीच्या योजनेअंतर्गत उत्पादन सुरु केल्याच्या दिनांका (CoP) पासून ३ वर्षापेक्षा कमी कालावधीकरिता विस्तारीत उद्योगाच्या सवलतीचा लाभ घेतला आहे, अशा ग्राहकांना (CoP) नंतर ३ वर्षे किंवा विद्यमान योजनेचा कालावधी संपेपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत विद्यमान (सुधारित) दराने विस्तारीत सवलतीचा लाभ देण्यात यावा.

७. विस्तारीत उद्योगाची सवलत लागू केलेल्या/लागू होणाऱ्या पात्र औद्योगिक ग्राहकांना उत्पादन सुरु केलेल्या दिनांकापासून (दि.०१.०४.२०१६ किंवा त्यानंतर विस्तार केलेले उद्योग) ते प्रत्यक्ष सवलत लागू केलेल्या दिनांकापर्यंतच्या पूर्व कालावधीच्या देय परतावा रक्कमेकरिता महावितरण कंपनीने शासनाची पूर्व परवानगी घ्यावी.

८. दि.०१.०४.२०२२ किंवा त्यानंतर अस्तित्वात येणाऱ्या नवीन उद्योगांना स्थिर सवलत पहिली तीन वर्षे मिळणार नाही, मात्र तीन वर्षानंतर योजना कालावधीच्या मर्यादेत त्यांना स्थिर सवलत लागू करण्यात यावी.

नवीन व विस्तारीत उद्योगांना खालीलप्रमाणे सवलत देण्यात यावी.

| विभाग | लघुदाब/उच्चदाब/अतिउच्चदाब (पैसे/युनिट) |
|---|---|
| विदर्भ | १२० |
| मराठवाडा | ११० |
| उत्तर महाराष्ट्र | ७५ |
| डी | ५५ |
| डी+ | ८५ |

५. केवळ एम्बेडेड पारंपारिक अथवा अपारंपारिक / हायब्रीड स्ववीज ऊर्जा प्रकल्प, सहवीज (Co-generation) निर्मिती प्रकल्प असे औद्योगिक ग्राहक, ज्या प्रमाणात महावितरण कंपनीकडून वीज घेतील अशा ग्राहकांना सदर सवलत महावितरणच्या वीज वापरावर लागू राहिल. मुक्त प्रवेश (Open Access) / अंशत: मुक्त प्रवेश (Partial Open Access) ग्राहकांना या योजनेअंतर्गत वीजदर सवलत अनुज्ञेय असणार नाही.

६. या योजनेअंतर्गत अनुज्ञेय ठरणाऱ्या सवलती ज्या औद्योगिक ग्राहकाने वीज देयकाचा तत्पर भरणा (Prompt Payment) केल्यास व त्याच्याकडे कुठलीही थकबाकी नसल्यासच अनुज्ञेय राहतील.

७. पात्र औद्योगिक ग्राहकांना वस्त्रोद्योग सवलतीसह विविध अनुज्ञेय सवलती (उपरोक्त विदर्भ, मराठवाडा सवलत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग सवलत इ.) लागू केल्यानंतर परिणामी वीजदर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजदर आदेशामध्ये मान्य केलेला त्या त्या वर्षाचा सरासरी वीज खरेदी दर व पारेषण दर यांच्या एकत्रित दरापेक्षा कमी असणार नाही.

तसेच या क्षेत्रातील वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग सवलत व विदर्भ मराठवाडा सवलत लागू केल्यानंतर परिणामी वीजदर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजदर आदेशामध्ये मान्य केलेला त्या त्या वर्षाचा सरासरी वीज खरेदी दर व पारेषण दर यांच्या एकत्रित दरापेक्षा कमी असणार नाही. तसेच सदर सवलत ही वस्त्रोद्योग सवलतीचा पूर्णत: लाभ घेतल्यानंतरच्या उर्वरित मर्यादेत देण्यात यावी.

तसेच उर्वरित महाराष्ट्रातील कार्यरत व नवीन वस्त्रोद्योग घटकांना प्रचलित वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.२१.१२.२०१८ मधील अनुज्ञेय सवलतीसह इतर सवलती (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग सवलत इ.) लागू केल्यानंतर देखील परिणामी वीजदर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजदर आदेशामध्ये मान्य केलेला त्या त्या वर्षाचा सरासरी वीज खरेदी दर व पारेषण दर यांच्या एकत्रित दरापेक्षा कमी असणार नाही.

८. ज्या महिन्यात उच्चदाब व अतिउच्चदाब ग्राहकांकडून करार मागणीचे उल्लंघन करण्यात येईल (Contract Demand Violation) त्या महिन्यात अशा ग्राहकांना कार्यक्षमतेवर आधारित सवलत देय ठरणार नाही.

९. लघुदाब यंत्रमाग ग्राहकांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या प्रचलित शासन निर्णय दि.२१.१२.२०१८ व दि.१३.०९.२०१९ च्या तरतुदीनुसार वीजदरातील सवलती लागू असल्याने सदर ग्राहकांना या शासन निर्णयातील सवलती लागू राहणार नाहीत.

१०. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या भविष्यातील वीजदर आदेशामधील बदलाच्या अनुषंगाने कार्यक्षमतेवर आधारित सवलतीत बदल करण्यात येईल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, शासन निर्णय दि.२३/०६/२०२२ ची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

१. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या दरामध्ये सुसूत्रिकरण करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२३/०६/२०२२ ची अंमलबजावणी दि.०१/०४/२०२२ पासून करण्यात येईल.
२. शासन निर्णयानुसार थकबाकीदार अथवा थकबकीचा भरणा करण्याकरीता हप्त्याची सुविधा (Installment) घेतलेल्या ग्राहकांना सदर सवलत लागू नाही. तसेच थकबाकीच्या कारणास्तव न्यायालयीन प्रक्रियाधीन असलेल्या ग्राहकांना सुध्दा सदर सवलत लागू राहणार नाही.
३. ज्या महिन्यात उच्चदाब व अतिउच्चदाब ग्राहकांकडून करार मागणीचे उल्लंघन करण्यात येईल (Contract Demand Violation) त्या महिन्यात अशा ग्राहकांना कार्यक्षमतेवर आधारित सवलत (लोड फॅक्टर व ToD सवलत) देय ठरणार नाही. तथापि, लघुदाब ग्राहकांना सदर अट लागू राहणार नाही.
४. २० केडब्ल्यु पेक्षा कमी जोडभार असणाऱ्या लघुदाब ग्राहकांना पॉवर फॅक्टर वर आधारीत कार्यक्षमतेची सवलत लागू राहणार नाही.
५. २० केडब्ल्यु पेक्षा जास्त व २० केडब्ल्यु पेक्षा कमी जोडभार असणाऱ्या तथापी ऐच्छिकरित्या ToD Tariff स्विकारलेल्या लघुदाब औद्योगिक ग्राहकांना ToD मीटर ग्राहक समजण्यात येईल व अशा ग्राहकांना ToD सवलत लागू असेल.

६. लघुदाब, उच्चदाब व अतिउच्चदाब मिश्र वापर असलेल्या ग्राहकांनी नॉन ToD सब-मीटर बसविलेले असल्यास अशा ग्राहकांचा बिगर औद्योगिक वापर हा औद्योगिक वापरातून वजा करतांना प्रथम स्लॉट-अ मधून व उर्वरित स्लॉट-ब मधून वजा करण्यात यावा.

७. पात्र औद्योगिक ग्राहकांना वस्त्रोद्योग सवलतीसह विविध अनुज्ञेय सवलती (उपरोक्त विदर्भ, मराठवाडा सवलत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग सवलत इ.) लागू केल्यानंतर परिणामी वीजदर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजदर आदेशामध्ये मान्य केलेला त्या त्या वर्षाचा सरासरी वीज खरेदी दर व पारेषण दर यांच्या एकत्रित दरापेक्षा (आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता रू.४.७२ प्रति युनिट) कमी असल्यास फरकाची प्रति युनिट सवलतीची रक्कम फरकाच्या प्रमाणात (Proportionate) सर्व सवलतीमधून म्हणजेच स्थिर सवलत, कार्यक्षमतेवर आधारीत सवलत व नवीन / विस्तारीत सवलत यातून वजा करण्यात यावी.

८. परिणामी वीज दराची गणना करतांना देयकातील विद्युत शुल्क व वीज विक्रीकर वगळुन सवलतीसह इतर सर्व घटकांचा विचार करण्यात यावा.

९. शासन निर्णयाप्रमाणे प्रति औद्योगिक ग्राहक कमाल मर्यादा रू.२० कोटी चे पालन करत असताना, ज्या महिन्यात सवलतीची रक्कम कमाल मर्यादेपेक्षा जास्त होत असेल त्या महिन्यात सवलतीची जादा रक्कम सर्व प्रकारच्या सवलती मधून त्या प्रमाणात कमी करण्यात येईल जेणेकरून वार्षिक कमाल मर्यादा उल्लंघन होणार नाही.

   उदाहरणार्थ ज्या ग्राहकाला त्या महिन्यापर्यंत रू.१९ कोटीची सवलत प्राप्त झाली असेल व त्या महिन्यातील देय सवलतीची रक्कम दोन कोटी असल्यास वार्षिक कमाल मर्यादेच्या अनुषंगाने त्या महिन्यात एक कोटी रुपये सवलत सर्व प्रकारच्या सवलती मधून कमी करण्यात येईल.

१०. विस्तारीत उद्योगांकरीता वाढीव वीज वापराची परिगणना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर आदेशातील तरतूदीनुसार लागू करण्यात यावी म्हणजेच विस्तारीत उद्योगांकरिता वाढीव वीज वापर हा व्यावसायिक उत्पादन सुरु झालेल्या दिनांकापूर्वीच्या मागील तीन वर्षांचा सरासरी वीज वापर विचारात घेऊन त्यावर सवलत अनुज्ञेय करावी. ज्या ग्राहकांचा ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला नसल्यास अशा ग्राहकांना मागिल ३ वर्षांचा कालावधीपूर्ण झाल्यानंतर सदर सवलत देय राहील.

११. ज्या ग्राहकांचा लोड फॅक्टर हा १००% पेक्षा जास्त असल्यास परंतु, करार मागणीचे (Contract Demand Violation) उल्लंघन झाले नसल्यास अशा ग्राहकांना शासन निर्णयानुसार १००% लोड फॅक्टर मर्यादेपर्यंत लोड फॅक्टरवर आधारित सवलत देय ठरेल. तथापि, अशा ग्राहकांची तपासणी मंडळ कार्यालय स्तरावर करण्यात यावी.

१२. नवीन उद्योगाची सवलत शासन निर्णयानुसार ३ वर्षांच्या कालावधीकरीता लागू राहील. जे औद्योगिक ग्राहक पूर्वीच्या शासन निर्णयानुसार नवीन उद्योगाच्या सवलतीचा लाभ घेत आहेत व ज्यांचा सवलतीचा कालवधी ३ वर्षे पूर्ण झालेला आहे अशा ग्राहकांची सदर सवलत बंद करण्यात येईल. तथापि, ज्या ग्राहकांचा नवीन उद्योगाच्या सवलतीचा कालावधीला ३ वर्षे पूर्ण झाले नाही अशा ग्राहकांना शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पात्रता प्रमाणपत्र सादर करावी लागेल व त्यानंतरच त्यांना नवीन उद्योगाची सवलत लागू होईल.

१३. उद्योग संचालनालय किंवा जिल्हा उद्योग केंद्र यांनी नवीन उद्योगाकरीता निर्गमित केलेले पात्रता प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करण्याकरीता नवीन वीज जोडणी मॉडयूल (NC Module) मध्ये तरतूद माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात येईल.

१४. शासनाच्या सुधारीत निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता नवीन उद्योगांकरीता उद्योग संचालनालय किंवा जिल्हा उद्योग केंद्र यांनी निर्गमित केलेले पात्रता प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येत आहे.

१५. नवीन उद्योगांना स्थिर सवलत पहिली तीन वर्षे मिळणार नाही, मात्र तीन वर्षानंतर योजना कालावधीच्या मर्यादेत त्यांना स्थिर सवलत लागू करण्यात यावी.

१६. औद्योगिक ग्राहकांनी नवीन उद्योगाचे पात्रता प्रमाणपत्र ऑनलाईन सादर केल्यानंतर अशा पात्रता प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी मंडळ कार्यालय स्तरावर करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात

यावी. सदर बाबत तपासणी व पडताळणी करतांना परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार पडताळणी करण्यात यावी व सदर परिशिष्ट नवीन वीज जोडणी मॉडयूल (NC Module) मध्ये अपलोड करण्यात यावे.

१७. ज्या ग्राहकाने हेतूपरस्पर नवीन उद्योगाच्या सवलतीचा लाभ घेण्याकरीता अस्तित्वातील उद्योगाचा वीज पुरवठा कायमचा खंडीत करून त्याच जागेमध्ये नवीन ग्राहक क्रमांकासह वीज पुरवठा पूर्ववत केल्यास अशा औद्योगिक ग्राहकांना नवीन उद्योगाच्या सवलतीचा लाभ देण्यात येऊ नये. असे प्रकार टाळण्याकरीता मंडळस्तरावर महिनानिहाय तपासणी करण्यात यावी.

१८. विस्तारीत उद्योगांनी उद्योग संचालनालय किंवा जिल्हा उद्योग केंद्र यांनी विस्तारीत उद्योगाकरीता निर्गमित केलेले पात्रता प्रमाणपत्र संबंधित मंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर अशा पात्रता प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी मंडळ कार्यालय स्तरावर करण्यात येऊन विस्तारीत उद्योगाची सवलत लागू करण्याकरीताचा प्रस्ताव मुख्य कार्यालयास सादर करावा.

१९. मंडळ कार्यालय / विभागीय कार्यालया / उप विभागीय कार्यालय स्तरावर ग्राहकांचा Activity Code तपासण्याची कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून उत्पादन / औद्योगिक (Manufacturing) करणाऱ्या घटकांना सवलतीचा लाभ मिळेल. Activity Code उपलब्ध नसलेल्या उद्योग वर्गवारील ग्राहकांना सवलतीचा लाभ मिळणार नाही.

२०. एम्बेडेड पारंपारिक अथवा अपारंपारिक / हायब्रीड स्ववीज ऊर्जा प्रकल्प, सहवीज (Co-generation) निर्मिती प्रकल्प असे औद्योगिक ग्राहक, ज्या प्रमाणात महावितरण कंपनीकडून वीज घेतील अशा ग्राहकांना सदर सवलत महावितरणच्या वीज वापरावर लागू राहिल. तथापि, सदर सवलत लागू करतांना सुधारीत शासन निर्णयानुसार मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या पात्रता प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

२१. मंडळ कार्यालय स्तरावर कुठल्याही ग्राहकाला पूर्वलक्षी प्रभावाने लाभ देण्यात येऊ नये. पूर्वलक्षी प्रभावाबाबतचा परतावा रक्कमेचा प्रस्ताव मुख्य कार्यालयास सादर करण्यात यावा.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, वरील निर्देशांचे काटेकोर पालन करून शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**संचालक (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत:**
प्रेषण यादीप्रमाणे.

**ANNEXURE “A”**

| **Circle :** | | **Consumer Name :** | **Cons No :** |
|---|---|---|---|
| **Sr No.** | **Point of verification** | **Particulars** | **Remark (Please Spciefy Details of Column No.3)** |
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | Verification of Industrial Status of Consumer. | 1. Verify the consumer is Industrial Consumer or not? | |
| | | 2. Consumer Activity in detail. | |
| | | 3. Manufacturing Industry or Nonmanufacturing (ITITES, Data centre etc.) | Manufacturing : Eligible<br>Non Manufacturing : Not Eligible |
| 2 | Date of Connection | 1. Whether Consumer’s date of Connection is prior to 01.04.2016. | |
| | | 2. Consumer has submitted DIC certificate or not. (If YES date of submission & mode of submission i.e. through portal or offline) | |
| 3 | PD to Reconnect | 1. Whether Consumer got permanently disconnected after 01.04.2016 and taken connection at same premises and got benefit of New Connection subsidy. (YES / NO) | If YES : Not Eligible for Subsidy |
| | | 2. If YES Details of such consumer, name of owner (Old & New), company name (Old & New), CIN no(Old & New), Consumer No (Old & New), date of PD & date of reconnection | If YES : Not Eligible for Subsidy |
| 4 | Merger & Amalgamation / splitting of load | 1. Whether consumer is formed new entity after merger / amalgamation or splitting of load of existing connections and availed the new connections subsidy benefit. | |
| | | 2. If YES details of Merger & Amalgamation / splitting of load | If YES: Not Eligible for Subsidy |
| 5 | Change Name | 1. By change of name only consumer has availed new connections subsidy benefit. | |
| | | 2. If YES details change of Name | If YES : Not Eligible for Subsidy |
| 6 | Change Voltage level | 1. By changing the Voltage level i.e. from HT to LT or vice-versa the consumer has availed the subsidy benefit if new connection. | |
| | | 2. If YES mention the details | If YES: Not Eligible for Subsidy |